ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# २१ व्या शतकातील भारतीय शेतमजुरांच्या समस्या

**प्रा. संजय दादासाहेब ठिगळे,** विभाग प्रमुख व्यावसायिक अर्थशास्त्र, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली – 416 416 ई–मेल : thigalesanjay@gmail.com मोबाईल : 9422041929

**गोषवारा**

*खाजगी क्षेत्रातील सर्वात मोठा असंघटीत व्यवसाय म्हणजे भारतीय शेती औद्योगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाच्या प्रक्रियेनंतर भारतीय शेतीत अमूलाग्र बदल झालेले दिसून येतात. मान्सूनवरती अवलंबून असणरी शेती, पारंपारीक पध्दतीने शेती करणारा शेतकरी, अन्नधान्यासाठी परकीयांच्या मदतीसाठी याचना करणारे सरकार, अशा एक ना अनेक वैशिष्ठे असणारी स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वीची शेती 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात बदलत गेली. जवळपास 12 पंचवार्षिक योजना पूर्ण केलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेने गेल्या 70 वर्षाच्या काळात कृषी क्षेत्रासाठी अनेक महत्वकांक्षी योजना आखल्या काही अंशी यश प्राप्त झाले. औद्योगीकरणामुळे शेतीतील यांत्रिकीकरणांस मोठया प्रमाणावर मदत झाली. विशेषतः हरितक्रांतीमुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. आज फळे, फुले निर्यात करण्याची क्षमता आमच्यात आली. एवढेच नव्हे तर जवळपास 125 कोटी लोकसंखेला अन्नधान्य पुरवठा करण्याचे काम फक्त शेतीमुळेच शक्य झाले. भारतीय तिजोरीत परकीय चलन आले त्याचे श्रेय शेतीक्षेत्राला जाते याकडे डोळे झाक करुन चालणार नाही.*

*शेती क्षेत्रातील लक्षणीय प्रगती ही एक बाजू मात्र दूसरी बाजू विचारात घेतली तर चित्र खूपच विचित्र आहे. शेतीत भांडवलदारांचा शिरकांव मोठया प्रमाणावर वाढू लागला आहे. यांत्रीकीकरण व काही अंशी संगणकीकरण जोर धरु लागले आहे. भारतीय शेती, शेतकरी व शेतमजूर निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकला. वर्षाकाठी कसातरी 150 दिवस रोजगार प्राप्त होवू लागला, शेतकरी व शेतमजूरांना दारिद्रयाचे दुष्टचक्र भेदणे अवघड होवून बसले आहे. असंघटित असलेल्या शेतकरी व शेतमजूराचा शासनावर कधीच अंकुश राहिला नाही. याउलट संघटीत शक्तीने दबावयंत्राच्या साह्याने आपले उकळ पांढरे करुन घेतले. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेती, शेतकरी व शेतमजूरावर आज प्रतिकूल परिणाम झालेला दिसून येतो. 21व्या शतकात भांडवलशाहीमुळे अनेक समस्या निर्माण होणार आहेत. आर्थिक विषमता, सामाजिक ताणतणाव वाढतच राहणार अशीच परिस्थिती राहिली तर भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणजे शेती कधी मोडून पडेल हे सांगता येणार नाही. सत्तेचा कणा व्यवस्थित ठेवायचा असेल तर शेतमजूर कामगार, शेतकरी, कष्टकरी सुस्थित असलाच पाहिजे. एवढेच नव्हे तर श्रमीक कष्टक–यांच्या पदरात सत्ता संपत्तीचा रास्त वाट देण्याची मानसिकता शासन, भांडवलदार व भांडवलदार शेतकरी यांच्यात वाढीस लागली नाही तर आर्थिक, सामाजिक संघर्षास तोंड द्यावे लागेल.*

**कळीचे मुद्दे** : शेती – शेतकरी – शेतमजुर – 21 वे शतक

## <u>प्रास्ताविक</u>

21व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतातील सर्वांनाच भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पडू लागले. मात्र भारताची स्वातंत्र्यप्राप्ती नंतर 70 वर्षे '' भूकेलेल्यांना अन्न व तहानलेल्यांना पाणी '' देण्यात गेली भूकेलेल्यांना अन्न देण्यासाठी आम्ही हरित क्रांती केली. एवढेच नव्हे तर दुसऱ्या हरित क्रांतीसाठी दमदार पाऊले उचलली, त्यासाठी शेतीचा सर्वांगीण विकास ध्यास घेऊन गेल्या 12 पंचवार्षिक योजनांच्या काळात अनेक उपाययोजना केल्या. विशेषतः शेती क्षेत्रात मोठया प्रमाणावर यांत्रीकीरणाने मूळ धरले आहे.

वास्तविक सर्वात मोठा राजा मेघराजा, सर्वात मोठा पूत्र गाईचा आणि सर्वात मोठा दात नांगराचा दुर्दैवाने अलीकडच्या काळता राज कधी फकीर झाला लक्षात आले नाही. सर्वात मोठा पूत्र गाईचा परंतु यांत्रिकीकरणामुळे बैलांची संख्या कमी होऊ लागली व बैलजोडी शेतकऱ्याला परवडणारे राहिली नाही. तर दुस–या बाजूला खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या (खाऊजा संस्कृती) रेटयात सर्वात मोठा असणारा नांगराचा दात कधी पडला हे समजलेच नाही. सर्व जगाचा अन्नदाता शेतकरी आत्महत्येकडे वळू लागला. नैसर्गीक आपत्ती, दारिद्रय, असंघटीतपणा, निरभ्रता अशा एक ना अनेक कारणांमुळे शेतमजुरांवर बेकारीची व दारिद्रयाची कुऱ्हाड कोसळली.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**शेतमजूरांची दयनिय अवस्था**

भारतीय अर्थव्यवस्थेचा ज्याला आपण कणा म्हणतो ती म्हणजे भारतीय शेती एवढेच नव्हे तर एक विकसनशील व कृषीप्रधान राष्ट्र म्हणून आपली जगाच्या पाठीवर ओळख आहे. वास्तविक देशातील तरुणाई व कष्टकरी समाज हाच आमचा पाया आहे. याची जाणीव आम्हाला आहे कारण महासत्तेचे स्वप्न सत्यात आणावयाचे झाल्यास विकासाच्या प्रवाहात हे दोन घटक नसतील तर महासत्तेचे स्वप्न स्वप्नच राहिल. भारतातील शेती मान्सूनवरती अवलंबून असल्यामुळे आधुनिक व व्यापारी पध्दतीने शेती करता येत वर्षाकाठी शेतमजुराला जेमतेम 150 दिवस रोजगार मिळतो. एका बाजूला संघटीत वर्गाला पूर्ण वेळ रोजगार, धरभत्ता, वाहनभत्ता अनेक सणांना सुट्या, पगार वाढ, वेतन आयोग शेतमजुरांच्या वाटयात किमान वेतन नाही. एवढेच नव्हे तर वेतनात टोकाची भिन्नता, महिलांना वेतन कमी पुरुषांना जास्त ही असमानता महिलांच्या सबलीकरणाची भाषा करणाऱ्या देशात बळ धरु लागली आहे. शेतमजुरांच्या राहणीमानाच्या दर्जाचा आम्ही विचार करणार आहोत की नाही. विकासाच्या प्रक्रियेतले कोणते निकष शेतमजुरांना लागू होतात हा संशोधनाचा विषय आहे. शेतमजुराला
वेतन कमी त्यामुळे त्याचे दरडोई उत्पन्न कमी, दरडोई उत्पन्न कमी त्यामुळे राहणीमानाचा दर्जा कमी अशा दुष्टचक्रात अडकलेल्या शेतमजुरांची अवस्था खूपच हालाखीची झाली. त्याची कारणे शेतीची वाईट अवस्था परिणामी शेतकरी अडचणीत आणि शेतकरी अडचणीत त्यामुळे शेतमजुर त्याच्यापेक्षा अडचणीत ही दुष्टचक्राची शृंखला कधीच तुटली नाही. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतावर रोजगार कमी आहे व पर्याय रोजगाराची व्यवस्था ग्रामीण भागात पुरेशी नसल्यामुळे शेतमजुर खूपच अडचणीत येऊ लागला आहे.

**प्रश्न शोषणाचा**

गरीब व मागासवर्गीय समाजातून आलेला शेतमजुरांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. दारिद्रयाच्या दुष्टचक्रात अडकलेल्या शेतमजुरांना वेतन कमी त्यामुळे वर्षानुवर्षे आर्थिक आरिष्टात सापडलेल्या शेतमजुरांला कर्जबाजारीपणामुळे ग्रासलेले दिसून येतो. वाढता कर्जबाजारीपणा हीच खरी मूळ समस्या आहे. सावकार व जामीनदारांकडून उचल घेतल्याशिवाय पर्याय उरत नाही. सावकारांच्याकडून घेतलेल्या कर्जाचा व्याजाचा दर 40 ते 50 टक्के एवढा दिसून येतो. फक्त व्याजाचा दरच जास्त नाही तर त्याची शाररीक व मानसिक होणारी पिळवणूक ही कर्जावरील व्याजदरापेक्षा भयानक आहे. स्त्री मजुरांचे होणारे शोषण ही शारिरिक व मानसिक समस्या आहे. भारतातील एकूण बाज मजुरापैकी 1/3 बालमजुर शेतीत काम करीत आहेत. शेतमजुराच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न त्याहूनही गंभीर आहे. भारतातील शिक्षण व्यवस्था आणि '' शिक्षण सर्वांसाठी '' हा नारा अधिक लोकप्रिय होऊ लागला आहे. शिक्षणापासून वंचीत असणाऱ्या शेतमजुरांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे हेच खरे भारतातील शिक्षण व्यवस्थेपुढील सर्वात मोठे आव्हान आहे. शेतमजुरांच्या मुलांना उच्चशिक्षण उपलब्ध होणार का ? आपल्या मुलाने उच्च शिक्षण घेवून डॉक्टर, इंजिनियर, वकिल व्हावे असे वाटत नसेल का ? वाटत असेल तर 21व्या शतकातले महागडे शिक्षण शेतमजुराच्या खिशाला परवडेल का ?

**प्रश्न रोजगाराचा**

आज ऊस उत्पादक व साखर कारखाने यांची अवस्था जेवढी वाईट आहे त्यापेक्षा जास्त ऊसतोडणी कामगारांची आहे. ऊसतोडणीच्या निमित्ताने स्थलांतरीत झालेल्या कामगारांची व त्यांच्या कुटूंबाची अवस्था फारशी चांगली नाही, हेच वास्तव आहे. असंघटीत अकुशल, निरक्षर, अंधश्रध्दाळू अशी अनेक वैशिष्टये असणाऱ्या शेतमजुरांचा पुरवठा मोठया प्रमाणात आहे. मात्र 21 व्या शतकातल्या शेतीत अशा मजुरांना पूर्वीसारखी मागणी राहिलच असे नाही. मागणीपेक्षा पुरवठा जास्त असल्यामुळे अर्थशास्त्रातला नियम लागू पडतो. शेतमजुरांची सौदाशक्ती कमी आहे. जवळपास 51.37 टक्के शेतमजुर भूमीहीन आहेत. मोठया प्रमाणावर हंगामी बेकारी आहे. एवढेच नव्हे तर कामाचे तास व कामाच्या ठिकाणची परिस्थिती फारशी चांगली नाही. कायमस्वरुपी शेतावर असणाऱ्या शेतगडयाची अवस्था म्हटलं तर तो कुटूंबातला एक असतो आणि म्हटलं तर तो कुठेच नसतो.

**प्रश्न आरोग्याचा व सुरक्षिततेचा**

शेतमजूराच्या आरोग्याचा आणि सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर आहे. कोणत्याही माणसाचे आरोग्य अनेक घटकांवर अवलंबून असते. शेतमजुरांच्या आरोग्याचा विचार केला तर 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात हरितक्रांतीमुळे शेतीत नविन तंत्रज्ञानाचा व व्यूव्हरचनेचा अवलंब करण्यात आला. एवढेच नव्हे तर शेतीतून उत्पादन वा उत्पादकता वाढ याच्यावर अधिक लक्ष केंद्रीत करण्यात आले. उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी मोठया प्रमाणावर रासायनिक खतांचा वापर मोठया प्रमाणावर वाढला. फॉस्फेट, नायट्रेट, अमोनियम सल्फेट यांच्या अतिरिक्त वापरांमुळे जमीनी

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

क्षारपड झाल्या. त्याचबरोबर अनेक रसायनांचा शेतीवर जेवढा प्रतिकूल परिणाम झाला तेवढाच शेतमजुरांवरही झालेला आहे. रासायनिक खतांचा वाढ़ता वापर त्याचबरोबर किटकनाशकांची फवारणी शेतमजुराला करावी लागत असल्यामुळे अनेक शेतमजुरांना कातडीचे रोग, त्याचबरोबर श्वसनाचे विकार जडू लागले आहेत. अलिकडे शेतमजुरांना व शेतकऱ्यांना विजेच्या लपंडावामुळे रात्री अपरात्री शेतात पाणी पाजावे लागते. त्यांना सर्पदंश, विजेचा झटका बसणे अशा संकटांना तोंड द्यावे लागते.

**प्रश्न दारिद्रयाचा**

भारतातील शेतमजुरांच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी शेतीबरोबर पर्यायी रोजगार व्यवस्था उपलब्ध करुन द्यावे लागेल. 21 व्या शतकात शेतमजुरांनी शेती क्षेत्रात नविन बदलाला सामोरे जाण्यासाठी नवनवीन अद्यावत ज्ञान अवगत करावे लागेल. किमान वेतन कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागेल. सावकाराच्या व सधन शेतकऱ्यांच्या कचाटयातून बाहेर पडण्यासाठी शेतमजुरांना कमी व्याज दराने दिर्घ मुदतीचा वित्तपुरवठा करावा लागेल. आरोग्याबरोबर सामाजिक सुरक्षितता त्याचबरोबर आर्थिक व सामाजिक समानता आणावी लागेल.

**सारांश**

भारतासारख्या विकसनशिल राष्ट्रात अनेक क्षेत्रात प्रगती झाली. विशेषतः शेती क्षेत्रात अनेक बदल झाले. अलिकडच्या काळात शेतीत भांडवलशाही व्यवस्थेची मोठया प्रमाणावर सुळसुळाट वाढला आहे. 21 व्या शतकात शेती ही भांडवलशाही प्रधान होण्याची शक्यता लक्षात घेता असंघटीत असणाऱ्या शेतमजुराची मोठया प्रमाणावर पिळवणूक होण्याची शक्यता लक्षात घेऊन काबाड कष्ट करणारा, दारिद्र्यात पिचलेला शेतमजुर टिकला पाहिजे. अन्यथा '' आहेरे आणि नाहिरे '' हा वर्ग संघर्ष पुन्हा नव्याने निर्माण होईल. एवढेच नव्हे तर अशीच दयनीय अवस्था राहिली तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेली शेती व्यवस्था मोडकळीस येईल की काय अशी भिती वाटते.